स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची रूपरेषा

-: संशोधन विषय:-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या
अंमलबजावणीमुळे मराठवाड्यातील बालकांची सामाजिक सुरक्षितता
- एक चिकित्सक अभ्यास.

-:संशोधक:-

निलेश देविसींग राठोड
(M.S.W, SET)
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र ,
सिडको नवीन नांदेड

-: मार्गदर्शक:-

डॉ. मेघराज अ. कपूरडेरिया
(सहयोगी प्राध्यापक)
(M.A, M.S.W, B.ed, NET, Ph.D,)
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नवीन नांदेड.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीमुळे मराठवाड्यातील बालकांची सामाजिक सुरक्षितता - एक चिकित्सक अभ्यास.

प्रस्तावना :-

अभिकथित आणि कायद्याची संघर्ष आढळलेली बालके काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यातील मुलभूत गरजा पुरवुन योग्य ती काळजी, संरक्षण, विकास व उपचार आणि समाजात पुन्हा एकात्मिक करणे, याची तरदुत करुन त्यांच्या विकासविषयक गरजा पुरवुन आणि त्यांच्या संबंधातील प्रकरणांचा निवाडा करतांना व ती निकालात काढतांना मुलांचे सर्वोत्तम हितसंबंध जपले जाण्यासाठी त्यांच्याशी मैत्रीपुर्ण संबंध ठेवुन त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी आणि तत्संबंधातील आणि तनुषंगिक बाबींसाठी संबंधीत पुरविलेल्या प्रक्रियेव्दारे आणि प्रस्थापीत संस्था व मंडळे यांच्याव्दारे त्यांच्या संबंधातील कायद्याचे एकत्रिकरण करणे व त्यात सुधारणा करणे याकरीता अधिनियम, ज्याअर्थी, संविधानात अनुच्छेद १५ चा खंड ३ अनुच्छेद ३९ चे खंड ड अणि च अनुच्छेद ४५ आणि ४७ यांसह विविध तरतुदीमध्ये राज्यांकडे अधिकार आणि कर्तव्ये म्हणुन राज्यांवर, मुलांच्या सर्व गरजा भागविण्यात आल्या आहेत, आणि त्यांचे मुलभूत मानवी हक्क पुर्णतः सुरक्षित आहेत यांची सुनिश्चिती करण्याची प्राथमिक जबाबदारी लादली आहे. आणि ज्याअर्थी, भारत सरकारने संयुक्त राष्ट्राच्या महासभेत, ११ डिसेंबर १९९२ रोजी मुलांच्या हक्कासंबंधी मंजुरी दिलेली, अभिसंधी अंगिकार करुन मुलांचे सर्वोत्तम हित साधण्यात सर्व भागीदार राज्यांनी अनुसरावयाची ठराविक मानके विहित केली आहेत. आणि ज्याआर्थी मुलांच्या हक्कासंबंधीत अभिसंबंधीमध्ये विहित केलेली मानके, बाल न्याय प्रसासन, 1985 सालचे संयुक्त राष्ट्राचे मानक किमान नियम (बिजींग नियम) बालकांना त्यांचे स्वातंत्र्य हिरावुन घेण्यापासुन संरक्षण देण्याकरिता संयुक्त राष्ट्रांचे नियम (१९९०) मुलांचे सरंक्षण आणि सहकार याबाबत हेग अभिसंधमधीमध्ये झालेले आंतरदेशीय दत्तक विधान (१९९३) आणि इतर सर्व संबंधीत

अंतराष्ट्रीय विलेख लक्षात घेऊन, बालकांच्या संबंधात विद्यमान कायदा हा अभिकथित आणि कायद्याशी संघर्ष करतांना आढळलेली बालके आणि काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यासाठी अगदी योग्य असा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० हा पुनअधिनियमित करणे इष्ट आहे. त्याआर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी संसेदकडुन पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो. १. संक्षिप्त नाव, प्रारंभ व प्रयुक्ती १) या अधिनियमास बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ असे

म्हणावे २) त्याचा विस्तार जम्मु व काश्मीर राज्य खेरीजकरुन संपुर्ण भारतभर आहे. ३) केंद्र सरकार,राजपत्रातील अधिसुचनेव्दारे नियम करील अशा दिनांकास तो अंमलात येईल. i) आशंका, स्थानबध्दता, शिक्षा, शास्ती वा कारावास, पुनर्वसन काही कायद्याची संघर्ष करणाऱ्या मुलांचे समाजात पुनएकात्मीकरण करणे ii) मुलांच काळजी घेणे व सरंक्षण करणे यांची गरज असतांना त्यांच्याबाबतीत पुनर्वसन, दत्तकविधान, पुनर्विलीनीकण आणि पुनः स्थापना यासंबंधी असलेल्या कार्यपध्दती आणि न्यायनिर्णय किंवा आदेश यांच्यासह अंमलात येईल. व्याख्या : - या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, १) परित्यक्त मुल म्हणजे जे मुल जैविक पालकांनी किंवा दत्तक पालकांनी सोडुन दिलेले आहे, किंवा समितीने चौकशीअंती परित्यक्त मुल असे जाहिर केलेले आहे. २) दत्तकविधान म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याव्दारे मुल जे आपल्या जैविक पालकांशी आपले सर्व हक्क, विशेषाधिकार आणि जबाबदाऱ्या यांनी बांधले गेलेले असते त्यांच्यापासुन कायमचे विभक्त केले जाऊन दत्तक घेणाऱ्या होते. पालकाचे कायदेशीर मुल होते.

बाल न्याय मंडळ :-

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी राज्य शासन प्रत्येक जिल्हयात या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संबंधात अशा मंडळांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांना नमुन दिलेली किंवा त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी एक किंवा अधिक बाल न्याय मंडळ गठीत करु शकेल.

२) मंडळ हे ३ वर्षाचा अनुभव असलेला महानगर दंडाविधारी किंवा यथस्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (जेथे मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्यायदंडाधिकारी नसेल तेथे (यापैकी यांचा उल्लेख प्रमुख दंडाधिकारी म्हणुन केला जाईल) आणि दान सामाजिक कार्यकर्ते, ज्यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, यांचे मिळुन बलेले असेल आणि त्यांचे एक न्यायपीठ तयार होईल आणि अशा प्रत्येक न्यायपीठाकडे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा यथास्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याला प्रदान केलेले अधिकार असतील.

३) मंडळाचा सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यापुर्वी तो कोणताही सामाजिक कार्यकर्ता, मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण किंवा कल्याण कार्यक्रम यामध्ये किमान सात वर्षे प्रत्यक्षपणे सक्रिय सहभागी व्यवसायी व्यक्ती असल्याखेरील आणि त्याची बालमानसशास्त्र, मानसोपचार, समाजशास्त्र किंवा कायदा यामधील पदवी असल्याखेरील त्याची मंडळाचा सदस्य म्हणुन नियुक्ती केली जाणार नाही.

या अधिनियमान्वये ज्यांना अधिकार प्रदान केलेले नाहीत, अशा न्यायधिशांनी वापरण्याची कार्यपध्दती :-

१) अपराध केल्यास संशय असल्याने त्यांच्यासमोर सादर केलेला आरोपी बालक आहे असे जेव्हा अधिनियमान्वये मडळाचे अधिकार प्रदान केलेल्या मॅजिस्ट्रेटचे मत असेल, त्यावेळी त्यांनी विलंब न लावता त्याचे मत अभिलीखीत करुन सदर बालकास केलेल्या अभिलेखासह सदर अधिकारक्षेत्र असलेल्या मडळाकडे पाठवावे.

२) ज्यावेळी एखाद्या अपराधाचा आरोपी व्यक्ती मंडळाव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात सदर व्यक्ती बालक असल्याचा किंवा सदर अपराध घडला तेव्हा व्यक्ती बालक होती, असा दावा करेल किंवा अपराध घडला तेव्हा सदर बालक होती असे स्वतः न्यायधिशांचे मत असेल, सदर न्यायधिश याबाबत चौकशी करीतील, सदर व्यक्तीच्या वयाबाबत आवश्यक पुरावे (यात शपथपत्र अंतर्भूत नाही) नोंदवतील आणि सदर व्यक्तीच्या वयाबाबत जास्तीत जास्त अचूक निष्कर्ष नोंदवतील.

३) जर सदर व्यक्तीने अपराध केलेला आहे व अपराध घडला त्यावेळी सदर व्यक्ती बालक होती, असा न्यायालयाचा निष्कर्ष असल्यास, न्यायधीश सदर व्यक्तीस योग्य आदेश आणि असल्यास शिक्षा सुनावण्यासाठी मंडळाकडे पाठवतील व न्यायालयाने काही आदेश दिलेले असेल तरी ते प्रभावी राहणार नाहीत.

४) जर कलमांतर्गत येणाऱ्या व्यक्तीस संरक्षित कोठडीत ठेवण्याची आवश्यकता असल्यास व सदर व्यक्ती बालक असल्याच्या दाव्याबाबत चौकशी सुरु असल्यास दरम्यानच्या काळात सदर व्यक्तीला संरक्षित जागेत ठेवले जाईल.

कायद्याच्या विरोधात गेलेल्या बालकांबाबत वापरण्याची क्रियारीती :-

कायद्यविरोधात गेल्याचा संशय असलेल्या बालकास ताब्यात घेणे :-

१) ज्यावेळी कायद्याच्या विरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास पोलीस ताब्यात घेतील, त्यावेळी तात्काळ सदर बालकास विशेष बाल पोलीस पथकाच्या किंवा नामनिर्देशित बाल कल्याण अधिकाऱ्याच्या ताब्यात दिले जाईल व ते वेळ न घातवतात बालकास ताब्यात घेतल्याच्या जागेपासुन प्रवासाचा कालावधी वगळता २४ तासाच्या आत मंडळासमोर हजर करतील. परंतु,कोणत्याही परिस्थितीत कायद्याच्या विरोधात गेल्याचा संशय असलेल्या बालकास, पोलीस कोठडीत किंवा कारागृहात ठेवले जाणार नाही.

२) राज्य शासन या अधिनियमास सुसंगत असे नियम बनवेल.

i. ज्यांच्या मार्फत, कायद्यानिरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास मंडळासमोर हजर केले जाईल अशा व्यक्ती (यात नोंदणीकृत स्वयंसेवी किंवा अशासकिय संघटनांचा अंतर्भात असेल) उपलब्ध करुन देण.

ii. कायद्याविरुध्द गेल्याचा संशय असलेल्या बालकास कोणत्या पध्दतीने आवश्यकतेनुसार निरीक्षणगृहात किंवा संरक्षित जागी गाठविले जाईल ते ठरवुन देणे.

कायद्यविरुध्द गेलेल्या बालकास ज्या व्यक्तीच्या ताब्यात सोपविले असेल, अशा व्यक्तीची भूमिका : :-

ज्यांच्या ताब्यात कायद्याविरुध्द गेलेल्या बालकास सोपविले असेल, सदर आदेश कायम असेपर्यंत ते त्या बालकाचे माता पिता असल्याप्रमाणे सदर बालकाचे संगोपण ही त्या व्यक्तीची जबाबदारी असेल.

परंतु, जरी सदर बालकाच्या माता-पित्यांनी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने सदर बालकाचा ताबा मागितला तरीही मंडळाने ठरवुन दिलेल्या कालावधीपर्यंत ते बालक त्या व्यक्तीच्या जबाबदारीत असेल, अपवाद जर सदर बालकाचे माता-पिता किंवा इतर कोणी व्यक्ती सदर बालकास सांभाळण्यास योग्य असल्याचे मंडळाचे मत असल्यास.

संशोधन साहीत्य आढावा :-

संशोधन करीत असतांना निगडीत साहित्त्य आणि संशोधकाचे परीक्षण करुन संशोधकाशी संबंधित जुन्या आणि नवीन तथ्यांचे विश्लेषण करणे किंवा त्याचा आढावा घेणे हे गरजेचे असते आणि त्या अनुषंगाने प्रस्तुत अध्यापनाशी संबंधित साहीत्य उपलब्ध परिस्थितीत परीक्षण करण्यात येते. साहीत्य आढावा घेताना विषयाशी संबंधित साहीत्य परीक्षण करण्यात येते.

सामाजिक संशोधन पध्दती (**डॉ. सुधीर बोधनकर**, **प्रा. विवेक आलोनी**, **ॲङ मृणाल कुलकर्णी**)

संशोधन पध्दती कोणती व कशाप्रकारे वापरल्या जाईल या विषयी संदर्भ या ग्रंथाद्वारे घेण्यात आला आहे. त्यामध्ये आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलन इत्यादी सारख्या पध्दतीचा संदर्भ घेण्यात आला आहे.

बाल न्याय (**मुलांची काळजी व सरंक्षण**) **अधिनियम २०१५** (**माहिती पुस्तीका**)

प्रस्तुत पुस्तीकेमधुन मुलांची काळजी घेण्याची आणि संरक्षणाची सर्वसाधारण तत्वे, न्यायधिशांनी वापरण्याची कार्यपध्दती, कायद्याच्या विरोधात गेलेल्या बालकांबाबत वापरण्याची क्रियारीती, माता-पिता किंवा पालक किंवा परिविक्षा अधिकारी यांना माहिती देणे, निर्घृण

अपराधाबाबत मंडळामार्फत प्राथमिक पडताळणी, बाल न्यायालयाचे अधिकार, बाल कल्याण समिती, समितीचे अधिकार, समितीचे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाबाबत करावयाची कारवाई, देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकाबाबत आदेश, पुनर्वसन आणि सामाजिक पुनएकात्मीकरणाची कार्यपध्दती, मुक्त आश्रयस्थान (शेल्टर), उसने संगोपण (फॉस्टर केअर) प्राजक्ता निरिक्षण गृहे, विशेष गृहे, सुरक्षा गृह, बाल गृह, दत्तकविधान इत्यादी माहिती घेण्यात आली.

संशोधन पध्दती :-

संशोधन प्रकल्प अहवाल पूर्ण करण्याच्या उद्देशाने मी " **बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीमुळे मराठवाड्यातील बालकांची सामाजिक सुरक्षितता - एक चिकित्सक अभ्यास**." या संशोधन विषयाची निवड केली. समाजातील ज्ञात, अज्ञात प्रश्नाची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने केलेला प्रयत्न म्हणजे सामाजिक संशोधन होय. समाजामध्ये अनेक सामाजिक, आर्थिक, राजकिय समस्या असतात. अशा प्रकारच्या स्थितीचा किंवा सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास करुन समस्यांचा शोध घेणे म्हणजे सामाजिक संशोधन होय.

सामाजिक संशोधनाच्या व्याख्या :-

मोझर :- सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नविन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबध्द संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात.

विषयाची निवड :-

मुलांच्या हक्कासंबंधीत अभिसंबंधीमध्ये विहित केलेली मानके, बाल न्याय प्रसासन, 1985 सालचे संयुक्त राष्ट्राचे मानक किमान नियम (बिजींग नियम) बालकांना त्यांचे स्वातंत्र्य हिरावुन घेण्यापासुन संरक्षण देण्याकरिता संयुक्त राष्ट्रांचे नियम (१९९०) मुलांचे सरंक्षण आणि सहकार याबाबत हेग अभिसंधमधीमध्ये झालेले आंतरदेशीय दत्तक विधान (१९९३) आणि इतर सर्व संबंधीत अंतराष्ट्रीय विलेख लक्षात घेऊन, बालकांच्या संबंधात विद्यमान कायदा हा अभिकथित आणि कायद्याशी संघर्ष करतांना आढळलेली बालके आणि काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यासाठी अगदी योग्य असा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० हा पुनअधिनियमित करणे इष्ट आहे.

यामुळे काळजी व सरंक्षणची गरज असणारे बालके कोणते आहेत ? बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बालकांच्या समस्या सोडविल्या जातात का ? काळजी व संरक्षणा अंतर्गत मुलांना कोणकोणत्या योजनांचा लाभ दिल्या जातो ? बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत दत्तक विधान काय आहे ? बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बाल कल्याण समिती काय आहे ? बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बाल न्याय मंडळ काय आहे ? या सर्व बाबींचे अध्ययन करणे आवश्यक ठरते. याकरिताच संबंधित विषयाची निवड संशोधणासाठी करण्यात आली आहे.

विषयाचे नाव :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीमुळे मराठवाड्यातील बालकांची सामाजिक सुरक्षितता - एक चिकित्सक अभ्यास.

विषयाचा अर्थ :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ :-

मुलांच्या काळजी व संरक्षणसाठी निर्माण केलेला कायदा होय.

अंमलबजावणी :-

अंमलबजावणी म्हणजे एखादी योजना, एखादी पद्धत किंवा कोणतीही रचना म्हणजे अंमलबजावणी होय.

मराठवाडा :-

मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यातील एक भूभाग आहे. जो आठ जिल्यानी मिळून बनलेला आहे. (औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड आणि हिंगोली)

बालक :-

० ते १८ वयोगटातील व्यक्ती म्हणजे बालक होय.

सुरक्षितता :-

सुरक्षितता म्हणजे केवळ शारीरिक संरक्षणच नव्हे, तर जीवनातील विविध पैलूंमधील स्थिरता आणि सुरक्षिततेची स्थिती होय.

बदल :-

बदल म्हणजे एखाद्या स्थिती, परिस्थिती, किंवा वस्तूमध्ये होणारा परिवर्तन किंवा हस्तांतरण.

अभ्यास :-

अभ्यास म्हणजे ज्ञान, कौशल्ये आणि समज यांची प्राप्ती करण्यासाठी केलेली नियोजित आणि सातत्यपूर्ण प्रक्रिया.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

काळजी व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यातील मुलभूत गरजा पुरवून योग्य ती काळजी, संरक्षण, विकास व उपचार आणि समाजात पुन्हा एकात्मिक करणे, याची तरदुत करुन त्यांच्या विकासविषयक गरजा पुरवून आणि त्यांच्या संबंधातील प्रकरणांचा निवाडा करतांना व ती निकालात काढतांना मुलांचे सर्वोत्तम हितसंबंध जपले जाण्यासाठी त्यांच्याशी मैत्रीपुर्ण संबंध ठेवुन त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी आणि तत्संबंधातील आणि तनुषंगिक बाबींसाठी संबंधीत पुरविलेल्या प्रक्रियेव्दारे आणि प्रस्थापीत संस्था व मंडळे यांच्याव्दारे त्यांच्या संबंधातील कायद्याचे एकत्रिकरण करणे व त्यात सुधारणा करणे याकरीता बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५, हा कायद्या अतिस्तवात आणल्या गेल्या, त्यानुशंगाने निवडलेल्या संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे विषद करता येते.

१) संबंधित संशोधन हे इतर संशोधन करणाऱ्यांना उपयुक्त आहे.

२) मुले हे राष्ट्राची संपत्ती आहे त्याचे सरंक्षण करणे आपले कर्तव्य आहे

३) संशोधनाच्या माध्यमातून मिळविलेल्या सांख्यिकीय माहितीचा उपयोग (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ बाबत जाणिव जागृती करण्याबाबत उपयुक्त ठरेल.

संशोधनाची उद्दीष्टे :-

सामाजिक संशोधनाचा उद्देश हाच की, सामाजिक जिवनातील नविन तथ्य शोधणे व जुन्या तथ्यांचे परीक्षण करणे आणि यां तथ्यांतील अनुक्रम, परस्पर संबंध व कार्यकारण संबंध स्पष्ट करणे होय. म्हणजे संशोधनामुळे ज्ञानात जास्तीत जास्त भर पडते. नविन ज्ञान उपलब्ध होते व हे ज्ञान सामाजिक प्रगतीला व सामाजिक नियंत्रणाला सहायक ठरते. सामाजिक संशोधनामुळे सामाजिक समस्या शोधुन त्याचे निराकरण करण्यास मदत होते. तसेच विशिष्ट

उद्देश समोर ठेवल्यास संशोधन सोपे जाते व त्याला दिशा प्राप्त होते. त्या अनुशंगाने मी निवडलेल्या ग्रामीण कारागिरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन हा विषय पुर्णत्वास नेण्यासाठी निश्चित असे काही उद्दीष्ट्ये समोर ठेवले ती उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे.

उद्दीष्ट्ये :-

१) काळजी व संरक्षणाच्या दृष्टीने बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ अभ्यासणे.
२) बाल न्याय अधिनियम २०१५ मूळे सुरक्षितता झाली आहे याचा अभ्यास करणे.
३) बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ मुळे बालकाच्या सुधारणाचा अभ्यास करणे.
४) बाल संरक्षण कायदे यामुळे झालेल्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक अभ्यास करणे.
५) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणी मुळे बालकाचा विकास झाला याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

उपकल्पना हे संशोधकाला दिशा देण्याचे व तथ्य संकलनाकरीता मार्गदर्शन करण्याचे काम करित असते.

पी. व्ही यंगच्या मते :- "कार्यवाहक गृहीत कृत्य हा केंद्रीय कार्यवाहक विचार असुन तो संशोधनाचा आधार आहे. "

गृहीतके :-

१) काळजी व संरक्षणाच्या दृष्टीने बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ चे महत्व अभ्यासणे.
२) बाल न्याय अधिनियम २०१५ मूळे सुरक्षतात झाली आहे का याचा अभ्यास करणे.
३) बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ मुळे बालकाच्या सुधारणाचा अभ्यास करणे.
४) बाल संरक्षण कायदे यामुळे झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

५) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणी मुळे बालकाचा विकास झाला आहे का याचा अभ्यास करणे.

अध्ययनाचे क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययन क्षेत्रमध्ये मराठवाडा विभाग चा समावेश आहे.

अध्ययन विश्व :-

अध्ययन विश्वामध्ये मराठवाडा विभाग मधील बालकल्याण समिती, बाल न्याय मंडळ, चाईल्ड हेल्प लाईन, जिल्हा परिषद शिक्षक तसेच बालकासाठी काम करणाऱ्या व्यक्ती चा समावेश करण्यात येईल.

नमुना निवड :-

संशोधन समस्येविषयी संबंधित असणाऱ्या विश्वाचा आकार व्यापक असेल तर संपर्क साधुन तथ्य संकलन करणे संशोधकाच्या आवाक्या बाहेरचे काम असल्यामुळे संशोधकाला समग्र प्रतिनीधीक ठरणारा नमुना गट निवडावा लागतो. हा नमुना निवडण्याच्या शास्त्रीय पध्दती आहेत.

व्याख्या :-

१) **गुडे आणि हॉट** :- “नमुना त्यातील नांवाप्रमाणे एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे."

२) **श्रीमती. यंग** :- "एक सांख्यकिय नमुना म्हणजे संपुर्ण समुहाचा किंवा समग्राचा निवडलेला एक भाग होय. "

नमुना निवडीचे प्रकार :-

अ) संभाव्यता नमुना निवडीचे प्रकार :-

१) साधा यादृच्छिक नमुना निवड

२) स्तरित यादृच्छिक नमुना निवड

३) व्यवस्था बध्द नमुना निवड

४) बहुपदी नमुना निवड

गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकार :-

१) सोयीस्कर नमुना

२) सहेतुक नमुना

३) कोटा नमुना

प्रस्तुत संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकारातील सोयीस्कर नमुना पध्दतीतील वापर करण्यात येईल.

संशोधन आराखडा :-

कोणतेही कार्य करावयाचे तर त्यासाठी नियोजन करावे लागते. नियोजनाच्या दृष्टीने कामाची निश्चित दिशा ठरवावी लागते. प्रत्येक बाबतीत काही तरी वेळ, पैसा, श्रम, मणुष्यबळ यांचा विचार करून त्यांचा मेळ बसवावा लागतो. असे केल्याने कामात सुसुत्रता निर्माण होते. म्हणजेच कार्याचे पध्दतशिर नियोजन त्याची मांडणी आखावी लागते हे सगळयाचे स्वरूप म्हणजे आराखडा होय.

रसेल लॅक ऑफ :-

आराखडा म्हणजे विशिष्ट घटनेशी अथवा समस्येशी संबंधित निष्कर्ष प्रस्थापित करण्यासाठी तीचे संशोधन करण्यापुर्वीच संशोधन कार्यातील संभाव्य परिस्थिती बनविण्याची प्रक्रिया होय.

एकॉफ :-

निर्णय कार्यान्वित करण्याची स्थिती येण्यापुर्वीच निर्णय निर्धारीत करण्याच्या प्रक्रियेला आराखडा म्हणतात.

संशोधन आराखडयाचे प्रकार :-

संशोधन आराखडयाचे चार प्रकार पडतात.

१) अन्वेषणात्मक व परिचयात्मक

२) वर्णनात्मक

३) निदानात्मक

४) प्रायोगात्मक

प्रस्तुत अध्ययनात वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन पध्दती :-

सामाजिक संशोधन पध्दती ही शास्त्रीय स्वरूपाची पध्दती आहे. समस्या, विषयाबद्दल जिज्ञासु वृत्तीने सत्याचा शोध शास्त्रीय पध्दतीने होणे महत्वाचे लक्षण आहे. सामाजिक संशोधनात अनुभव प्रमाणित तथ्ये संकलित करावी लागतात.

सामाजिक संशोधन करीत असताना कल्पना पध्दतीचा उपयोग केला जात नाही तर पुर्णपणे वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. तथ्य संकलन ही वैज्ञानिक पध्दतीची पहीली महत्वाची अट आहे. पंचज्ञानेंद्रियां द्वारे होणारा स्थितीबोध म्हणजे तथ्य होय.

व्याख्या :-

गुडे आणि हॉट :- “तथ्य म्हणजे एक अनुभव सिध्द सत्यापनिय अवलोकन होय."

फेअर ॲन्ड चाईल्ड :- "तथ्य म्हणजे अशी घटना की, ज्याचे अवलोकन व मापन या बाबतीत सर्वाची सहमत होते. "

तथ्य संकलन :-

तथ्य संकलन पध्दतीचे दोन प्रकार पडतात.

१) प्राथमिक स्त्रोत

२) दुय्यम स्त्रोत

१) प्राथमिक स्त्रोत :-

ज्यामध्ये अध्ययन विषयाशी संबंधित असणा-या व्यक्ति आणि प्रत्यक्ष निरिक्षण यांचा यात समावेश होतो. व प्रथम प्रयत्नातुन अथवा एकत्र केलेले तथ्य म्हणजे प्राथामिक स्त्रोत होय. या मध्ये पुढील माध्यमाचा समावेश होतो.

१) मुलाखत

२) निरिक्षण

३) मुलाखत अनुसुची

२) दुय्यम स्त्रोत :-

प्रकाशीत व अप्रकाशीत कागदपत्रे, अहवाल, हस्तलिखीते, पत्रे, दैनंदिनी इत्यादी द्वारे जमा केले तथ्य म्हणजे दुय्यम स्त्रोत होय.

१) व्यक्तिगत प्रलेख :-

अ) आत्मचरित्रे

ब) रोजनिशी

क) आठवणी

ड) पत्रे

२) सार्वजनिक प्रलेख :-

अ) अप्रकाशीत सार्वजनिक प्रलेख

ब) सार्वजनिक प्रकाशित प्रलेख

यात रेकॉर्ड, प्रकाशित आकडे, वर्तमान पत्रे, पत्रिका, साप्ताहीके अन्य सामग्री यांचा समावेश होतो.

प्रस्तुत संशोधन प्रकल्प सादर करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीमधील मुलाखत व मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येईल.

तथ्य दुरुस्तीकरण :-

जुने तथ्य व नवे तथ्ये यांची पडताळणी करुन अनावश्यक व चुकिचे तथ्ये कमी करुन तथ्य दुरुस्ती केली आहे. तथ्य माध्यमाच्या प्रकारामधुन तथ्य संकलन केल्यानंतर त्यावर तथ्य प्रक्रिया केली आहे. यामध्ये त्याच्या विशिष्ट समघटकांच्या आधारावर त्याचे वर्गीकरण करावे लागते. अनावश्यक तथ्यांना गाळण्यात येतील. व मुक्त प्रश्नांना बंदिस्त प्रश्नामध्ये विभागुन त्यांना संकेत क्रमांक देण्यात येतील. व आणखी महत्वाच्या तथ्यांना प्रश्नावली अनुसुचिमध्ये किंवा पुन्हा प्रश्न विचारुन तथ्य संपादन केले जातील.

निष्कर्ष

गृहीतकृत्यांची पडताळणी

संशोधनाच्या मर्यादा

शिफारसी व सुचना

नियोजन प्रकरण

प्रकरण १ :- प्रस्तावना

प्रकरण २ :- संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण ३ :-

अ) संशोधन आराखडा

ब) मराठवाडा पार्श्वभूमी

प्रकरण ४ :- सारणी व विश्लेषण

प्रकरण ५ :- निष्कर्ष व सूचना

प्रकरण ६ :-

अ) संदर्भ ग्रंथ

ब) प्रश्नावली

संदर्भग्रंथ सूची

१. सामाजिक संशोधन पध्दती, डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक आलोनी, ॲड मृणाल कुलकर्णी

२. बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५,माहिती पुस्तीका

3. शासनाचे अधिकृत संकेतस्थळ, www.Maha.gov.in

४. बाल हक्क व कायदे - प्रा. डॉ. गणेश बोरकर

५. कायदे स्त्रिया व मुलांचे – डॉ. विजय नारायण जोशी व आर. आर. टिपणीस

६. बाल न्याय संरक्षण व संगोपन कायदा २०१५

७. पॉक्सो अधिनियम (Protection of Children from Sexual Offences Act), २०१२ – लेखक : विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार.

८. बालक व महिलांचे कायदे – डॉ. अर्चना मराठे

९. वृत्तपत्रे :- लोकमत , लोकसत्ता , सकाळ